नि.दि.दा.क्र.९६/२०२६

सर्जेराव वाडकर वि. अनुसया बिरादार व अन्य एक

| MHLA120006902026 | **नि.१३ वरील आदेश**<br>**(तडजोड पुरशीस)** |
|---|---|

आज रोजी वादी सर्जेराव पि. भानुदास वाडकर व प्रतिवादी क्र.१ अनुसया भ्र. मोहनराव बिरादार हजर. वादीतर्फे विधीज्ञ श्री. पी.एम. सुर्यवंशी आणि प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री. एस.एन. सुर्यवंशी हजर. वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्यामध्ये तडजोड झाल्याने सदरची पुरसिस निशाणी १३ लगत दाखल. पक्षकारांनी स्वेच्छेने तडजोड पुरसिस निशाणी १३ दाखल केली आहे. त्यावर त्यांच्या सुविध्य विधिज्ञांनी ओळख नोंदविली आहे. वादी व प्रतिवादी क्र.१ यांना तडजोड पुरसीसमधील मजकुर वाचून व समजून सांगण्यात आला. प्रतिवादी क्र.१ ही बहीण असून तिने वादीच्या हक्कात दावा मिळकतीवरील तिचा हक्क स्वईच्छेने सोडून दिल्याची बाब मान्य केली. तसेच त्यांनी तडजोडपत्रामधील मजकुर मान्य व कबुल असल्याचे कथन केले तसेच तडजोड पुरसीसीवरील सह्या व अंगठे त्यांचेच असल्याचे मान्य केले. उभय पक्षकारामधील तडजोड ही स्वइच्छेने केलेली असल्याचे त्यांच्या न्यायालयासमोरील पडताळणीमध्ये दिसून आले. सबब, सदरची तडजोड पुरसिस निशाणी १३ वाचुन दाखल केलेली आहे.

Digitally signed by
KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.04.09
17:07:20 +0530

(**श्रीमती के.पी.गाडे**)

दिनांक–०९/०४/२०२६.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
निलंगा, जि.लातूर

MHLA120006902026

**<u>नि.१ वरील आदेश</u>**

वादी सर्जेराव पि. भानुदास वाडकर व प्रतिवादी क्र.१ अनुसया भ्र. मोहनराव बिरादार व त्यांचे विधीज्ञ हजर. प्रतिवादी क्र.२ च्याविरुध्द वादीने यापुर्वी दावा काढून घेतलेला आहे. नि.क्र.१३ कडील तडजोड पुरशीसीप्रमाणे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| ०१. | नि.क्र.१३ कडील तडजोड पुरशीसीच्या अनुषंगाने दावा निकाली काढण्यात येतो. |
| ०२. | सदर तडजोड पुरसिस नि.क्र.१३ प्रमाणे हुकुमनामा तयार करणेत यावा. |
| ०३. | नियमाप्रमाणे न्यायीक मुद्रांक परत प्रमाणपत्र (रिफंड सर्टीफिकेट) देण्यात यावे. |
| ०४. | निशाणी क्र.१३ कडील तडजोड पुरशीस ही अभिलेखाचा अविभाज्य भाग आहे. |

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.04.09 17:07:26 +0530

**(श्रीमती के.पी.गाडे)**

दिनांक–०९/०४/२०२६.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
निलंगा, जि.लातूर